आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

६ नोव्हेंबर २१०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला जोर / ठिकठिकाणी बड्या नेत्यांच्या जाहीर सभा

- विधानसभा निवडणुकीसाठीचा राष्ट्रवादी काँग्रेसचा मतदारसंघनिहाय जाहीरनामा प्रसिद्ध/ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं घड्याळ हे निवडणूक चिन्ह न्यायप्रविष्ट असल्याचं स्पष्ट करणारं जाहीर प्रकटन ३६ तासांच्या आत प्रसिद्ध करण्याचं पक्षाचं न्यायालयात आश्वासन

- भारतीय अन्न महामंडळात केंद्रसरकार दहा हजार सातशे कोटी रुपयांची नवी समभाग गुंतवणूक करणार

- गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देण्याच्या प्रधानमंत्री विद्यालक्ष्मी योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी / भारतीय शेअर बाजार सावरले

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला आता केवळ १४ दिवस उरले असून विविध राजकीय पक्षांनी प्रचाराचा जोर लोवला आहे.

सत्ताधारी आणि विरोधी आघाड्यांचा प्रचार आणखी तीव्र झाला असून दिग्गजांच्या प्रचारसभा होत आहेत.

काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी आज नागपूर इथं संविधान संमेलनात सहभागी झाले होते. संविधान हे केवळ एक पुस्तक नसून,

जीवन जगण्याचं माध्यम आणि तत्वज्ञान आहे, असं त्यांनी यावेळी नमूद केलं. तत्पूर्वी त्यांनी, नागपूर इथल्या दीक्षाभूमीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती स्मारकाला भेट देऊन अभिवादन केलं. याप्रसंगी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार उपस्थित होते.

राहुल गांधी यांच्या हस्ते विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा **मुंबईतल्या वांद्रे कुर्ला** संकुल इथं प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेलाही ते संबोधित करतील.
प्रदेश काँग्रेसच्या निवडणूक प्रचार समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ नेते चंद्रकांत हंडोरे यांची नेमणूक झाली आहे.

**<><><><><>**

दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याभोवती अर्बन नक्षलींचा गराडा पडल्यामुळे ते आता काँग्रेस विचारसरणीचे राहिले नसून, अतिडावे बनल्याची टीका, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ते आज एका मुलाखतीमध्ये बोलत होते. भारतीय संविधानाची प्रत पारंपारिक निळ्या कव्हरमध्ये  असते, मात्र राहुल गांधी भारतीय संविधानाची प्रत लाल रंगाचं कव्हर घातलेली का दाखवतात, असा प्रश्नही त्यांनी केला. भारत जोडो यात्रेत सहभागी झालेल्या १८० संघटना विध्वंसक कृत्यात  सहभागी असणाऱ्या होत्या, असा आरोपही फडणवीस यांनी केला.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मासिक रकमेत ६०० रुपयांची वाढ करून पात्र महिलांना २१०० रुपये देण्याचं आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसनं दिलं आहे.  प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज मुंबईत पक्षाचा मतदारसंघनिहाय जाहीरनामा प्रसिद्ध केला. महायुतीच्या १० वचनांचा समावेश यात आहे. मतदारांना

आपापल्या मतदारसंघांचा जाहीरनामा टोल-फ्री क्रमांकावर ऐकता येईल असंही त्यांनी सांगितलं.

बारामतीतून मतदारसंघासाठीचा जाहीरनामा अध्यक्ष अजित पवार यांनी प्रसिद्ध केला. बारामतीला देशातला सर्वात आदर्श आणि प्रगत तालुका बनवण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं.

<><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं घड्याळ हे निवडणूक चिन्ह न्यायप्रविष्ट असल्याचं स्पष्ट करणारं जाहीर प्रकटन ३६ तासांच्या आत मराठीसह इतर भाषांमधल्या वृत्तपत्रांमध्ये ठळक पद्धतीनं छापू, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वोच्च न्यायालयाला दिलं आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या तोंडी सूचनेनंतर अजित पवार यांचे वकील बलबीर सिंह यांनी पवारांच्या वतीनं ही हमी दिली. विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाला घड्याळ चिन्ह वापरण्यापासून रोखण्याची मागणी करणारी याचिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटानं केली होती, त्यावर न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी अजित पवार यांच्या वकिलांनी हे आश्वासन दिलं.

<><><><>

विधानसभा निवडणुकीत माहीम आणि मानखुर्द-शिवाजीनगर या दोन मतदारसंघांमधल्या महायुतीच्या उमेदवारांना रिपब्लिकन पक्षाचा अधिकृत पाठिंबा असल्याची घोषणा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज केली. मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. माहीम मतदारसंघातून शिवसेनेचे सदा सरवणकर आणि मानखुर्द-शिवाजीनगर मतदारसंघात शिवसेनेचेच सुरेश पाटील उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत.

<><><><><>

भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या शुक्रवारी धुळ्यात प्रचारसभा घेणार आहेत. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने सभेच्या काळात या भागात विनापरवाना ड्रोन उडवायला प्रतिबंध घालणारा आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केला आहे.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेनं आपण महाराष्ट्रात आलो असून देशाला सक्षम करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राज्यात महायुतीचं  सरकार आवश्यक आहे, असं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज वाशिम इथं झालेल्या जाहीर सभेत सांगितलं.
अकोला जिल्ह्यातल्या अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या मूर्तिजापूर मतदारसंघातही योगी आदित्यनाथ यांनी सभा घेतली.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने मतदार जागृतीसाठी राज्य निवडणूक आयुक्तांतर्फे येत्या ८ नोव्हेंबर पासून मोबाईल व्हॅन्स सुरू करण्यात येणार आहेत. या व्हॅन्सवर मतदान जनजागृतीविषयक माहिती देण्यात येणार आहे. या गाड्या राज्यातल्या १५ जिल्ह्यांमध्ये मतदार जागृतीचं कार्य करतील.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज यवतमाळ जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><>

गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ मिळावं या हेतूनं पीएम विद्यालक्ष्मी योजनेला सरकारनं मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली. उच्च  शिक्षणासाठी आता विद्यार्थ्यांना विनातारण आणि  विना हमी कर्जपुरवठा होऊ शकेल, असं ते म्हणाले. ७ लाख विद्यार्थ्यांना मिळेल, अशी अपेक्षा आहे.

<><><><>

भारतीय अन्न महामंडळात दहा हजार सातशे कोटी रुपयांच्या नव्या समभाग गुंतवणुकीला मंत्रीमंडळानं आजच्या बैठकीत मान्यता दिली आहे. महामंडळाच्या कार्याला बळ मिळावं, या उद्देशानं हा निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. यामुळे व्याज आणि अनुदानाचं ओझं कमी होईल.अन्नधान्याची किमान आधारभूत किमतीत खरेदी, अन्नधान्य साठा राखणं,किमतीत स्थिरता राखणं अशा बाबतीत अन्न  सुरक्षेच्या धोरणात महामंडळाची महत्वाची भूमिका असते.

<><><><>

अमेरिकी राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प पुन्हा विजयी झाले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या विजयाबद्दल ट्रम्प यांचं अभिनंदन केलं आहे. यामुळं दोन्ही देशातली जागतिक आणि धोरणात्मक भागिदारी आणखी मजबूत होईल, लोकांच्या भल्यासाठी, जागतिक शांतता, स्थैर्य यासाठी एकत्र काम करुया, असं प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><>

देशातल्या शेअर बाजारात आज तेजी दिसली. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परदेशी गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतल्याने गेले

दोन दिवस शेअर बाजारात घसरण दिसून येत होती. मात्र, आज अध्यक्षीय निवडणुकीचे निकाल जाहीर होत असताना त्यात तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्स निर्देशांकात आज ९०१ अंकांची वाढ झाली आणि तो ८० हजार ३७८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २७१ अंकांची वाढ होऊन तो २४ हजार ४८४ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हवामानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली तर उर्वरित राज्यात किमान तापमान सरासरीच्या जवळपास होतं. येत्या दोन दिवसात संपूर्ण राज्यात हवामान कोरडं रहाण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><><>//